# नियमित दिवाणी दावा नंबर 261/11 मधील निशाण 05 वरील आदेश

1. वादीने प्रतिवादी विरुध्द तुर्तातूर्त मनाई मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

वादीची थोडक्यात हकीकत अशी आहे की,

2. मौजे लासरा, ता. कळंब येथील जमीन गट नंबर 95 क्षेत्र 80 आर. जिची चतु:सिमा पुर्वेस–माणिक मुकूंद शेळके यांची जमीन, पश्चिमेस–राजाभाऊ सुब्राव धायगुडे यांची जमीन, दक्षिणेस–अंबादास मोहन शेळके यांची जमीन व उत्तरेस – मधुकर साहेबराव शेळके यांची जमीन आहे. (सोईच्या दृष्टीने सदर जमिनीस वादग्रस्त जमीन असे संबोधण्यात येईल)

3. सदर वादग्रस्त जमिनीवर वादी मालकीचे काबीज असून वादचे नावाची 7/12 पत्रकात नोंद आहे. सदर वादग्रस्त जमिनीशी प्रतिवादीचा मालकी व कब्जाशी काही एक संबंध नाही. प्रतिवादी हा वादीचे वादग्रस्त जमिनीच्या दक्षिणेकडील शेजारी असून वादीचे क्षेत्राचे उत्तरेकडील मधुकर साहेबराव शेळके हे शेजारी आहेत. वादीस त्याचे क्षेत्राचे दक्षिणेकडील व उत्तरेकडील लगतच्या जमीन मालकांनी अर्थात प्रतिवादीने अतिक्रमण केल्याची दाट शंका आल्याने वादीने दोन्ही बाजुचे बांध हद्दी कायम करण्यासाठी संबंधित कार्यालयाकडे मोजणीसाठी अर्ज केला. दिनांक 06.03.2010 रोजी वरील जमीन संबंधित कार्यालयाकडून नियमानुसार मोजणी करण्यात आली व हद्दीच्या खुणा कायम करण्यात आल्या. सदर मोजणीमध्ये दक्षिणेकडून प्रतिवादीने 16 आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले, तसेच उत्तरेकडील शेतशेजारी यांनी 10 आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले, परंतु त्यांनी त्याच वेळी अतिक्रमण सोडून दिले आहे.

4. वादीने सदर अतिक्रमित क्षेत्र 16 आर सोडण्याबाबत प्रतिवादीस विनंती केली असता प्रतिवादीने केवळ आश्वासन देवूनही सोडून दिले नाही. त्यानंतर दिनांक 15.06.2011 रोजी प्रतिवादीने वादीस अतिक्रमीत क्षेत्र सोडण्यास नकार दिला. तसेच वादीचे कब्जातील 0 हेक्टर 64 आर या जमिनीवरील वादीचे कब्जे वहिवाटीस व सदर जमिनीवरील पेरणीपूर्व मेहनत मशागतीस अडथळा करुन वादीचे मालकी व कब्जास हरकत घेतली. तसेच सदर दाव्याचा निकाल लागण्यास बराच अवधी लागणार आहे, तसेच वादग्रस्त जमिन पेरणी विना पडून राहिली तर वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. म्हणून वादीने सदर तुर्तातूर्त मनाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

5. प्रतिवादीने निशाण 17 वर पुरसिस देवून त्याने सदर दाव्यास दिलेली त्याची कैफियत निशाण 16 ही तुर्तातूर्त मनाई अर्जास म्हणणे म्हणून वाचावे अशी विनंती केली आहे. प्रतिवादीने वादीचा दावा नाकारलेला आहे. त्याने पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादीच्या जमिनीसंबंधी अतिक्रमण केल्याचा संशय आहे, सदरचे तथाकथित अतिक्रमण आहे किंवा नाही याची पडताळणी एकत्रित मोजणी करुनच होवू शकते. त्यामुळे वादीचा दावा खर्चासह खारीज करण्याची विनंती केली आहे.

6. माझ्या अवलोकनार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे कारणांसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| 1) | वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी दावा आहे काय? | : | नकारार्थी |
| 2) | न्यायाचा समतोल कोणाच्या बाजुने आहे? | : | प्रतिवादीच्या बाजूने |

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| 3) जर अंतरिम हुकूम दिला नाही तर कोणाचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल? | : | प्रतिवादीच्या बाजूने |
| 4) अंतिम आदेश काय? | : | .. अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

मुद्दा कमांक 1 ते 4 करीता :

7. मुद्दा कमांक 1 ते 4 हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांची कारणमिमांसा एकत्रात नोंदवित आहे.

8. वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादीने त्याची जमीन दिनांक 06.03.2010 रोजी मोजून घेतली आहे, त्यात प्रतिवादीने 16 आर क्षेत्रावर अतिकमण केल्याचे दाखवले आहे. तसेच गट नंबर 96 च्या कब्जेदाराने 10 आर क्षेत्रावर अतिकमण केल्याचे दाखवले आहे, परंतु गट नंबर 96 च्या कब्जेदाराने मोजणीनंतर 10 आर अतिकमित क्षेत्राचा कब्जा वादीस दिला आहे. त्यामुळे वादीच्या ताब्यात फक्त 64 आर जमीन आहे असे सकृतदर्शनी दिसून येते. तसेच सदर क्षेत्रासंदर्भात मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे.

9. या उलट प्रतिवादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीने व उत्तरेकडील कब्जेदाराने 16 आर व 10 आर क्षेत्रावर अतिकमण केले आहे. परंतु वादीने सकृतदर्शनी उत्तरेकडील कब्जेदाराने 10 आर क्षेत्राचा कब्जा दिला आहे हे दाखविण्याकरीता कोणताही पुरावा दिलेला नाही. तसेच मिळकत पत्रिकेचे अवलोकन केले असता वादीची 0.04 आर जमीन कॅनल करीता संपादित केली आहे. त्यामुळे सकृतदर्शनी वादीच्या ताब्यात 64 आर जमीन राहत

नाही. जर वादीस 64 आर जमिनी संदर्भात मनाई दिली तर वादी मनाई आधारे प्रतिवादीच्या क्षेत्राचा ताबा घेईल, म्हणून न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजुने आहे. तसेच मनाई हुकूम दिला तर प्रतिवादीचे खुप हाल व नुकसान होईल. त्यांनी असा ही युक्तीवाद केला की, संयुक्त मोजणी केल्याशिवाय अतिक्रमण आहे किंवा नाही हे निष्पन्न होणार नाही.

10. वादी व प्रतिवादीनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादीने मिळकत पत्रिकेचा उतारा निशाण 7 व 8 वर दाखल केला आहे. त्यात वादीच्या मालकीची 80 आर जमीन दाखवली आहे, परंतु त्याच उता—यावर 0.04 आर क्षेत्र कॅनल करीता संपादित केल्याची नोंद आहे. तसेच वादीने दाखल केलेल्या मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता, वादीच्या उत्तरेकडील गट नंबर 96 च्या कब्जेदाराने वादीची 10 आर जमीन अतिक्रमण केल्याचे दाखवले आहे. परंतु वादीने सदर कब्जेदाराने 10 आर क्षेत्राचा ताबा दिला आहे. याबाबत कोणताही सकृतदर्शनी पुरावा दिलेला नाही. तसेच वादीने गट नंबर 96 च्या कब्जेदाराचा शपथपत्र दाखल केलेले नाही. यावरुन गट नंबर 96 च्या कब्जेदाराने वादीस 10 आर क्षेत्राचा ताबा दिला असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. तसेच मिळकत पत्रिकेच्या उता—यावरुन वादीचे 0.04 आर क्षेत्र कॅनल करीता संपादित केले आहे. त्याबाबत वादीने कोणताही सकृतदर्शनी खुलासा केलेला नाही.

11. वरील सर्व बाबींमुळे वादीच्या ताब्यात 64 आर क्षेत्र आहे असे प्रथमदर्शी दाखवण्यास वादीस अपयश आले आहे. वादीने त्याच्या ताब्यात 64 आर जमीन आहे हे सकृतदर्शनी न दाखवल्यामुळे न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे असे ग्राहय धरता येत नाही. परंतु वादीने दाखल केलेल्या मोजणी नकाशा व उता—याचे अवलोकन केले असता वादीचे 80 आर पैकी 0.04 आर क्षेत्र कॅनल करीता संपादित केले आहे. तसेच प्रतिवादी व गट नंबर 96 च्या कब्जेदाराने 16 आर व 10 आर क्षेत्र

अतिक्रमित केले आहे, यावरुन ही वादीच्या ताब्यात 64 आर जमीन आहे असे प्रथमदर्शनी ग्राहय धरता येत नाही. जर वादीस 64 आर क्षेत्रासंदर्भात मनाई दिली तर त्याचा गैरफायदा वादी घेईल असे नाकारता येत नाही, तसे झाल्यास प्रतिवादीचे वादी पेक्षा जास्त नुकसान होईल. म्हणून माझ्या मते वादीने प्रथमदर्शनी दावा त्याच्या बाजुने आहे हे सिध्द केलेले नाही. तसेच न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने नाही. या उलट न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजुने दिसून येतो. जर वादीस मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादीचे जास्त हाल व नुकसान होईल, म्हणून वादीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सध्याच्या परिस्थितीत अर्जाचा खर्च अंतिम निकालात समाविष्ट करण्यात यावा. म्हणून मी मुद्दा क्रमांक 1 चे उत्तर नकारार्थी नोंदवून, मुद्दा क्रमांक 2 व 3 चे उत्तर प्रतिवादीच्या बाजुने नोंदवून व मुद्दा क्रमांक 4 च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

1. वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.
2. दाव्याचा खर्च अंतिम निकालात समाविष्ट करण्यात यावा.

सही/–

दिनांक : 11–10–2011.

( यु.म.ह.खरादी )

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कळंब